# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

# महिन्याचा पहिला शुक्रवार, १ नोव्हेंबर २०१९

# पवित्र तास

**गायन** ः भजतो तुला भक्तीने (पा.क्र. ३०८)

या पवित्र मंदिरात प्रभूची आराधना करण्यासाठी आपण एकत्र जमलो आहोत. आपले संपूर्ण लक्ष प्रभूकडे लावू या. डोळे बंद ठेवून मन एकाग्र करू या.

**शांतता**

या जगात पवित्र जीवन जगण्यासाठी परमेश्वर प्रत्येक व्यक्तीला बोलावीत असतो. पवित्र जीवन जगणे म्हणजे प्रभूठायी जगणे, प्रभू मार्गाने चालणे, प्रभू शब्दानुसार जगणे. पवित्र आत्म्याने परिपूर्ण झालेली आणि अलिशबेच्या भेटीने हर्षभरित झालेली पवित्र मरिया पाविञ्याचा आनंद व्यक्त करताना म्हणते "माझा आत्मा उल्हासला आहे".

आपण प्रत्येक जण देवाच्या भेटीसाठी तळमळत असतो. प्रभू हाच आपल्या जीवनाचा आसरा असतो. प्रत्येक व्यक्तीला प्रभूचे पाचारण असते. मात्र परमेश्वराची वाणी आपल्याला ओळखता आली पाहिजे. त्यासाठी पवित्र मिस्सा, बायबल वाचन, वैयक्तिक प्रार्थना, रोझरी, नोव्हेना, साक्रामेंताची आराधना याद्वारे प्रभूला शरण जाणे गरजेचे असते.

आजचा तरूण वर्ग निराश, वैफल्यग्रस्त झालेला आहे. या स्पर्धेच्या युगात तो दबून गेला आहे. अशा प्रसंगी त्याच्या जीवनाला उभारी येण्यासाठी त्याला प्रार्थनेची आवश्यकता आहे. या ऑक्टोबर महिन्यात रोम व्हॅटिकन येथे होणा-या बिशपांच्या सिनडवर परमेश्वराचा आशीर्वाद यावा आणि जगभरच्या युवावर्गासाठी, त्यांच्या भविष्यासाठी जी चर्चा होणार आहे ती फलद्रूप व्हावी म्हणून या आराधनेमध्ये सर्व युवकांसाठी प्रार्थना करू या.

**शांतता**

**प्रार्थना** ः मानवी दुर्बलतेमुळे आपल्या दैनंदिन जीवनात कळत नकळत चुका, अपराध, राग, द्वेष, मत्सर, हेवा याद्वारे आपण परमेश्वराला दुखवत असतो त्याबद्दल क्षमायाचना करू या. प्रभू येशू आपल्या अंतःकरणाचा दरवाजा ठोकावत आहे आपण त्याला संपूर्ण मनाने शरण जाऊ या.

**प्रतिसाद ः प्रभो, आम्हाला क्षमा कर**

१. ख्रिस्ती श्रद्धेपासून दूर जाऊन चुकीच्या विचारसरणीला कळत नकळत बळी पडल्याबद्दल ...
२. कुटुंबामध्ये आईवडिलांचा, आजी आजोबांचा योग्य तो मान सन्मान न केल्याबद्दल ....
३. प्रेमाचे व पाविञ्याचे जीवन जगण्यास एक पती-पत्नी म्हणून कमी पडल्याबद्दल....
४. पवित्र मिस्सा आमच्या जीवनाचा आरसा आहे याची जाणीव तरूण तरूणींना न झाल्यबद्दल ...

५. आम्हाला दिलेल्या बुद्धीचा सुयोग्य वापार करून त्याद्वारे तुझी सुवार्ता गाजविण्यास कमी पडल्याबद्दल...
६. आमच्या आध्यात्मिक विकासासाठी झटणा-या धर्मगुरू, धर्मभगिनी हयांच्यावर अनाठायी टिका केल्याबद्दल...

थोडा वेळ शांत राहून विविध अपराधाबद्दल दयाळू परमेश्वर पित्याकडे विनम्र अंतःकरणाने क्षमा मागू या.

**प्रभूशब्द वाचन** ः १ करिंथ १२ ः १ ते ११

परमेश्वराचे वचन आमच्या नेत्रांना प्रकाश देते, आमच्या पावलासाठी दिवा असते. आपण शांतपणे प्रभूवचन लक्षपूर्वक ऐकू या.

**गायनः** परस्परावर प्रेम करा   ११३

**चिंतन** ः आपणा प्रत्येकामध्ये पवित्र आत्मा कार्यरत आहे  व त्याद्वारे निरनिराळी दाने परमेश्वराने आपणांला दिलेली आहेत. ती दाने आपल्याला ओळखता यावी म्हणून या वाचनावर चिंतन करू या.

**गायन** ः तू बोलाविले सेवा कराया   किंवा  प्रभू मज तव आधार हवा रे

**विनंत्या**

**प्रतिसाद ः प्रभो, आमची प्रार्थना ऐक**

१. या नोव्हेंबर महिन्यात होणा-या सर्व कार्यक्रमांवर परमेश्वराचा आशीर्वाद यावा व त्याद्वारे आपल्या धर्मग्रामात सतत आनंदाचे वातावरण असावे म्हणून आपण प्रार्थना करू या.
२. आजच्या तरूण-तरूणींना ब-या वाईटाची जाण होऊन प्रसार माध्यमाचा उपयोग त्यांना ज्ञान समृद्धीसाठी करता यावा म्हणून आपण प्रार्थना करू या.
३. हया महिन्यात प्रथम ख्रिस्तशरीर साक्रामेंताची तयारी करणाया आपल्या सर्व बालकांना परमेश्वराची विशेष कृपा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.
४. आपल्या धर्मप्रांतातील आणि विशेषतः आपल्या धर्मग्रामातील तरूणांना प्रभूच्या मळयात काम करण्याची प्रेरणा व धैर्य लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

आपल्या विविध गरजा आपण परमेश्वराकडे सादर करू या ः विशेषतः जे आजारी आहेत त्यांना चांगले आरोग्य लाभावे, बेरोजगार आहेत त्यांना रोजगार मिळावा, आपणास आवश्यक असलेला पाऊस मिळावा, इथे उपस्थित असलेल्या सर्व भाविकांना पवित्र आत्म्याचा आरोग्यदायी स्पर्श व्हावा.

आपण पैसा, धनदौलत मिळविण्यासाठी आरोग्य गमावतो व आरोग्य मिळविण्यासाठी सर्व पैसा खर्च करतो, आपण भविष्याच्या काळजीत वर्तमान गमावतो त्यामुळे आपण वर्तमानही जगत नाही व भविष्यातही जगत नाही. आपण असे जगतो की आपण कधीच मरणार नाही आणि असे मरतो की कधी जगलोच नाही. हे महान सत्य आपणांस समजावे म्हणून प्रार्थना करू या.

**साक्रामेंताचा आशीर्वाद**

**शेवटचे गायन** ः घेऊनी हाती ध्वज प्रीतीचा